REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
'वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ४ फेब्रुवारी, १९४२ अंक ५

## ७ वा आठवडा ★

'डिप्लोमसी' आणि 'ट्रेडसिक्रेट'
यांनीं उडविलेला गोंधळ

नवयुग चित्र

## संगम

मध्यें पहा
भूमिकाः—मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, विनायक.

### मिनर्व्हा—पुणें

रोज दोन खेळ ६। व १० शनि. रवि. सोम.
जादा खेळ ३ वा.

## ठेवी घेणें आहेत

- फक्त रु. वीस हजारापर्यंतच ठेवी घेणें आहेत.
- ठेवी घेण्याची मुदत फक्त १ मार्च १९४२ पर्यंतच आहे.
- कारखाना रात्रंदिवस चालू आहे.
- ठेवीची रक्कम खेळत्या भांडवलासाठी वापरली जाईल.

— जास्त खुलाशाकरितां समक्ष भेटा अगर लिहा —

**दि विजय टेक्स्टाइल्स लि.**
कर्वे युनिव्हर्सिटीसमोर, एरंडवणें, पुणें ४.

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत
कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव !** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### पर्ल बंदरावरील अचानक हल्ला

जपान पर्ल बंदरावर ७ डिसेंबर, १९४१ रोजीं अचानकपणें हल्ला कसा करूं शकला, ह्याची चौकशी करण्याकरितां सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशाचे अध्यक्षतेखाली प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांनीं एक कमिशन नेमलें होतें. "हल्ल्याचे दिवसापूर्वी दहा दिवस फिलिफाईन्समध्यें जपान्यांचा धोका असल्याचें अमेरिकन सरकारनें हवाईमधील नाविक अधिकाऱ्यांस कळविलें होतें, परंतु त्या अधिकाऱ्यांस वैमानिक हल्ल्याचा समीपपणा लक्षांत आला नाहीं. वैमानिक हल्ल्याची बिलकुल शक्यता नाहीं असें त्यांस वाटून ते गप्प बसले." अॅडमिरल किमेल व लेफ्टनंट जनरल वॉल्टर शॉर्ट, ह्यांचेवर कमिशननें दुर्लक्षपणाचा दोष ठेवला आहे. कमिशनच्या रिपोर्टाचा अमेरिकन सरकार पूर्ण विचार करून योग्य तो हुकूम सोडील.

### सहा लक्ष लोक ई. इं. रेल्वेनें बाहेर गेले

१३ ते २० डिसेंबर, १९४१ ह्या मुदतींत ईस्ट इंडिया रेल्वेनें ५,९२,५७२ लोक कलकत्ता सोडून गेले. साधारणपणें २½ लक्ष लोक एवढ्या मुदतींत एरव्ही बाहेर जातात.

### माळवा शुगर मिल्स, लि.

वरील नांवाची एक कंपनी किशनगड (देवास, धाकटी पाती) येथें नोंदण्यांत आली आहे. मुंबई-आग्रा रस्त्यावर गोपाळपूर येथें संस्थानचे हद्दींतच ४०० ते ५०० टनांचा साखर कारखाना उभारण्याचा कंपनीचा विचार आहे. देवास सरकारनें कंपनीच्या ५ लक्ष रुपयांच्या भागांची हमी घेतली आहे.

### ब्रह्मी विधिमंडळाची बैठक

अंदाजपत्रकाचा विचार करण्याकरितां ब्रह्मी विधिमंडळाची बैठक रंगून येथें नेहमीप्रमाणें भरविणें शक्य नसल्याकारणानें ती बैठक एकादे जिल्ह्याचे गांवीं भरविण्यांत येईल व तिचें काम थोडक्यांत आवरण्यांत येईल.

### चरखा संघास देणगी

तिरुपुर येथें एक खादी केंद्र स्थापन करण्याकरितां मद्रास सरकारनें अ. भा. चरखा संघास १९,८२० रुपयांची देणगी दिली आहे.

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेची स्थापना १९३८ मे मध्यें झाली. १९४१ अखेर तिचेकडे ३,८१७ खातीं होतीं व ठेवींची रकम ४५¾ लक्ष रुपये भरली. एकूण खेळतें भांडवल ६७½ लक्ष रुपये होतें. तिनें १९४१ सालीं क्लिअरिंग हाउसमार्फत १,१६,६६९ चेक्सची वसुली केली, त्यांत तीन उप-सभासद बँकांचे २१,३५७ चेक होते. बँकेस नफा ३२,२२ रुपये झाला, त्यापैकी २० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले.

### साखरेची सरकारी खरेदी

सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें, निर्गत करण्याकरितां हिंदुस्थान सरकारास बरीच साखर पाहिजे व सरकार ती हिंदी कारखान्यांकडून विकत घेणार आहे.

### युद्धपुकार

थायलंडनें ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेविरुद्ध युद्ध पुकारलें आहे.

### जनरल ऑबर्स्ट रोमेल

बेंगाझी पुनः सर करणाऱ्या जनरल रोमेल ह्या जर्मन सेनानीस हेर हिटलरनें जनरल ऑबर्स्टचा (दुसऱ्या दर्जाचा फील्ड मार्शल) दर्जा देऊन त्याची बढती केली आहे. रोमेलचा व हेर हिटलरचा निकटचा स्नेह असून रोमेल हा चालू युद्धापूर्वी हिटलरच्या बॉडीगार्डमध्यें वरिष्ठ जागेवर होता. पोलंडमध्येंहि त्यानें मर्दुमकी केली व फ्रेंच सेनेचा पराभव होण्यास कारणीभूत होणारा मॅजिनचा हल्ला त्यानेंच योजिला. लिबिया त्यानें जिंकला, त्यावेळीं चढाई करण्याची त्याची तयारी होती, ह्याची ब्रिटिशांना कल्पनाच नव्हती. आपल्या सैनिकांस ताजे राखण्याची त्याची योजना व रणांगणावरच दुरुस्ती करण्याचीं त्याचीं वर्कशॉप्स, हीं अत्यंत कार्यक्षम असतात.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २३ जानेवारी अखेर संपलेल्या आठवड्यांत २२ कोटि, ६३ लक्ष रुपये किंमतीच्या १,३८,०२१ चेक्सची देवघेव झाली.

### अँग्लो-सोव्हिएट-इराण करार

ग्रेटब्रिटन, रशिया व इराण ह्यांचेमधील करारावर सह्या झाल्या आहेत.

### विम्याच्या हप्त्यांत वाढ

हिंदुस्थानांतील कित्येक आयुर्विमा कंपन्या आपले हप्त्यांचे दर वाढविण्याच्या विचारांत आहेत. व्याजाच्या अल्प दरामुळें असें करणें आवश्यक झालें आहे. अर्थात्, नव्या विमेदारांसच नवे दर लागू होतील.

### हिंदी लष्कर

हिंदी लष्करांत दरमहा ५० हजारांची भर पडत आहे व १० लक्ष सैनिक आज सुसज्ज आहेत, असें दि. ब. रंगनाथन हे लंडनमधील एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

### स्टँडर्ड टाइम

बिहार, ओरिसा, बंगाल आणि आसाम ह्या प्रांतांतील स्टँडर्ड टाइम एक तास पुढें करण्यांत आली आहे. ह्या प्रांतांतील पोस्ट व तार ऑफिसें नव्या वेळेप्रमाणें काम करतील, परंतु रेल्वे मेल सर्व्हिसचें काम सध्याच्या स्टँडर्ड टाइमप्रमाणेंच चालेल.

### जपाननें व्यापलेल्या प्रदेशांतील बँका

जपाननें पादाक्रांत केलेल्या प्रदेशांतील विदेशी भांडवलाच्या सर्व विदेशी बँका जपानी सरकारनें बंद पाडल्या आहेत. जपानी धोरणास अनुसरून चालण्यास तयार असणाऱ्या बँकांस सवलती मिळतील.

### लष्करी अधिकाऱ्यांच्या पगारांत वाढ

इमर्जन्सी इंडियन कमिशन मिळालेल्या हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचे पगारांत वाढ करण्यांत आली असून ती १ जानेवारीपासून अंमलांत आली. विशेषतः विवाहित अधिकाऱ्यांस ह्यापुढें ज्यास्त पगार मिळणार आहे. पूर्वीच्या व नवीन मासिक पगारांची तुलना खाली केली आहे.

| दर्जा | पूर्वीचा पगार | नवा पगार |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| सेकंड लेफ्टनंट | ४०५ | ४५० |
| लेफ्टनंट | ४३० | ४९० |
| कॅप्टन | ५०० | ५६० |
| १४ वर्षांच्या नोकरीनंतर | ६०० | ६५० |
| मेजर | ८०० | ८५० |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६ | सासर मंडळाच्या इतर सूचना–कापसाच्या आयातीवर जादा जकात–ए. आर. पी. च्या खर्चाची वाटणी–आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था–फ्रेंच उद्योगधंद्यांवर जर्मनीचें वर्चस्व. | |
| २ आखूड धाग्याचा कापूस | ३७ | ८ डिसेंबर महिन्यांतील आर्थिक घडामोडी ... | ४१ |
| ३ कर्जरोख्यांची किंमत ... | ३७ | ९ निवडक बाजारभाव ... | ४१ |
| ४ गवयाच्या वाद्यांची विक्री | ३८ | | |
| ५ कोल्हापूर अर्बन को. बँक | ३८ | | |
| ६ हिंदी चित्रपटांची लांबी | ३८ | | |
| ७ स्फुट विचार ... मि. चर्चिल यांचा दणदणीत विजय—सासरेच्या धंद्याचें मध्यवर्ती मंडळ– | ३९ | | |

अर्थ

बुधवार, ता. ४ फेब्रुवारी, १९४२

## आखूड धाग्याचा कापूस

हिंदुस्थानचा जपानशीं होणारा व्यापार बंद पडल्यामुळें आखूड धाग्याच्या हिंदी कपाशीचें मोठें गिऱ्हाइक तुटून ह्या शेतीच्या मालाची स्थिति कठिण झाली आहे. ह्या जातीच्या कपाशीचें मामुली उत्पादन आणि त्यास असलेली हिंदुस्थानांतली मागणी ह्यांचा मेळ बसणें अशक्य आहे. आखुड जातीच्या कपाशीच्या उठावासाठी हिंदुस्थानास चालू युद्धापूर्वी बाहेरील देशांवर अवलंबून रहावें लागत असे; आतां युद्ध–परिस्थितींत ह्या परकी गिऱ्हाइकांची जागा स्वदेशी गिरण्यांस अत्यंत अल्प प्रमाणांतच घेतां येणें शक्य आहे. कपास तर हिंदी शेतकऱ्यांस रोकड उत्पन्न देणारें पीक आहे, आणि तिचें उत्पादन पूर्वीप्रमाणें चालू राहिल्यास हा माल कवडीमोल होऊन जाईल इतकेंच नव्हे तर त्याचा उठावच होणार नाहीं. ह्या कठिण प्रसंगांतून मार्ग कसा काढावा हा सरकारच्या व लोकांच्या पुढें अवघड प्रश्न उपस्थित झाला आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीची सभा मुंबई येथें नुकतीच भरली होती, तेव्हां त्या प्रश्नाचा विचार होऊन आखूड धाग्याच्या कपाशीचें क्षेत्र पन्नास टक्के कमी करण्यांत यावें आणि लांब धाग्याच्या कपाशीची लागवड करण्यास किंवा कपाशीच्या जागीं धान्याचीं पिकें काढण्यास शेतकऱ्यांस सरकारनें उत्तेजन व सहाय द्यावें अशा अर्थाचा ठराव मान्य करण्यांत आला. कॉटन कमिटीच्या शिष्टमंडळानें व्हाइसरॉयांची भेट घेऊन त्यांच्या पुढें आपलें म्हणणें मांडावें असेंहि सभेंत ठरलें.

कमिटीच्या ठरावाचा आशय वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. आखूड धाग्याच्या कपाशीचें मोठें गिऱ्हाइक तुटल्यामुळें आणि प्रस्तुत युद्ध किती काळपर्यंत चालेल ह्याचा अंदाज करणें अशक्य असल्याकारणानें जेथें हें पीक मुख्यत्वेंकरून होतें, त्या प्रांतांच्या व संस्थानांच्या सरकारांनीं आपल्या हद्दींतील ह्या जातीच्या कपाशीचें क्षेत्र निम्म्यानें कमी होईल अशी व्यवस्था करावी असें कमिटीनें म्हटलें आहे. स्थानिक परिस्थितीस अनुसरून धान्याचीं वगैरे पिकें कपाशीच्या ऐवजीं काढण्यांत यावीं आणि अशा पिकांच्या भरपूर पुरवठ्याचें विशेष महत्त्व आहे असें तिनें सुचवलें आहे, पिकांमध्यें असा बदल करणें शेतकऱ्यांस सोयीचें व्हावें ह्याकरितां प्रांतांच्या व संस्थानांच्या सरकारांनीं त्यांस जरूर दिसणारें सहाय द्यावें अशी कमिटीची शिफारस आहे. ह्या कामीं शेतकऱ्यांस तज्ज्ञांचा सल्ला लागेल, बीबियाणें लागेल किंवा पाणी पुरवठ्यासाठीं भांडवल लागेल त्याची तरतूद करण्यांत यावी आणि सरकारांनीं आपल्या योजनांची माहिती शक्य तितक्या लवकर शेतकऱ्यांस द्यावी असेंहि कमिटीच्या ठरावांत म्हटलें आहे. येता शेतीचा हंगाम चालू होण्यापूर्वी म्हणजे मार्चच्या सुमारास ही माहिती पुरवली जाणें अगत्याचें आहे हें उघड आहे.

आखूड धाग्याच्या कपाशीच्या पिकाचें क्षेत्र सध्या एक कोटि एकर आहे. तें निम्मे म्हणजे पन्नास लक्ष एकर वर नमूद केलेल्या सूचनेप्रमाणें झालें असतां ह्या कपाशीचें उत्पादन पुढील हंगामांत पंधरा लक्ष गाठी होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्यापैकी बारा लक्ष गाठी स्वदेशी गिरण्यांमध्यें आणि सुमारें चार लाख गाठी इतरत्र खपतील अशी कल्पना आहे. युद्धपुरवठा झाल्यास कापसाचें कापड लागतें, त्याच्या बनावटींत कांहीं भागापुरता आखूड धाग्याचा कापूस उपयोगांत आणतां येईल अशी सोय करण्यांत आल्यानें हिंदी गिरण्यांत तो माल घेतला जाण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे, ती वरील अंदाजांत हिशेबांत घेण्यांत आली आहे. आखूड धाग्याच्या कापसाचा उठाव कसा व्हावा, गिरण्यांनीं कापूस खरेदी करून त्याचा साठा करून ठेवणें किती शक्य आहे आणि ह्या कामीं पैसा लागेल तो कसा उभारावा इत्यादि प्रश्नांचा विचार हिंदुस्थान सरकार करीत असून त्या बाबतींत निश्चित योजना तयार व्हावयाची आहे. सेंट्रल कॉटन कमिटीचें शिष्टमंडळ व्हाइसरॉयांची भेट घेईल त्या वेळीं सरकारला आपली योजलेली व्यवस्था थोडीशी स्पष्ट रीतीनें व तपशीलवारपणानें जाहीर करण्याची संधि मिळणार आहे, तिचा फायदा घेतला जाईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. प्रस्तुत प्रश्न तातडीचा व महत्त्वाचा आहे ह्याची जाणीव सर्वांस आहे. त्याचप्रमाणें, तागाच्या पिकाचे बाबतींत सरकारास अनुभव आला आहे, त्याचाहि उपयोग कपाशीच्या पिकाचे बाबतींत करतां येण्यासारखा आहे. सेंट्रल कॉटन कमिटीनें प्रस्तुत प्रश्न हातीं घेऊन त्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न चालवला आहे त्याबद्दल तिचें अभिनंदन केलें पाहिजे. प्रांतिक ग्रामसुधारणा मंडळाची सभा मुंबई येथें गेल्या महिन्यांत भरली होती तींत आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड मर्यादित केली जाऊन तिच्या ऐवजीं धान्याचीं पिकें शेतकऱ्यांनीं काढण्यास प्रोत्साहन देण्याच्या प्रश्नास चालना देण्यांत आली होती ह्याची आठवण येथें वाचकांस होईलच.

### ३% १९४९–५२ च्या कर्जरोख्यांची किंमत

| फेब्रुवारी | किंमत रु. |
|---|---|
| १ ते ७ | १०० |
| ९ ते १४ | १००-०-९ |
| १६ ते २१ | १००-१-६ |
| २३ ते २८ | १००-२-३ |

पुढें प्रत्येक आठवड्यास दरशेकडा ९ पै ह्याप्रमाणें कर्जरोख्यांची किंमत वाढत जाईल.

## गवयाचीं वाद्यें डिक्रीचे अंमलबजावणींत जप्त करतां येतात काय ?

### मद्रास हायकोर्टाचा निवाडा

सीमाकुर्थी—अर्जदार ( डि. हो. ) वि. जोन्नाविथुला—गैर अर्जदार ( जजमेंट–डेटर )

अर्जदार ( सीमाकुर्थी, डिक्रीहोल्डर ) ह्यानें गैर–अर्जदारावर जोन्नाविथुला, जजमेंट-डेटर ) स्मॉल कॉज कोर्टांतून डिक्री मिळविली. गैर–अर्जदार संगीत शिकवून व कपडे शिवून देऊन आपला उदरनिर्वाह करीत असे. अर्जदारानें आपल्या डिक्रीचे अंमलबजावणींत गैर–अर्जदाराचे घरून कांहीं माल जप्त करून नेला. यांत शिवण्याचें यंत्र ( मशीन ), बाजाची पेटी, फिडल व वीणा इतक्या वस्तू होत्या. गैर-अर्जदारानें सि. प्रो. कोडच्या क.६० (१)(ब) प्रमाणें जप्तीस हरकत आणली. ती हरकत अशी होती कीं, गैर-अर्जदार कपडे शिवण्याचा व गाणें शिकविण्याचा धंदा करीत असल्यामुळें त्या दोन्ही धंद्यास लागणारीं अवजारें ( हत्यारें ) हीं कारागिराचीं अवजारें असतात म्हणून तीं जप्त करतां येत नाहींत. खालच्या कोर्टानें गैर-अर्जदाराची हरकत मान्य करून जप्त झालेला सर्व माल कपडे शिवण्याचें मशीन, बाजाची पेटी, फिडल व वीणा जप्तींतून सोडून दिला, म्हणून अर्जदारानें हें रिव्हिजन केलें होतें.

“अर्जदारानें जप्त केलेल्या वस्तूंना कारागिराचीं अवजारें म्हणतां येतें किंवा काय हें आपल्याला पहावयाचें आहे. कपडे शिवण्याचें यंत्र कारागिराचें अवजार असतें, म्हणून तें जप्तीस पात्र नसतें, ह्याबद्दल आम्हाला मुळींच शंका नाहीं. आतां प्रश्न उरला बाजाची पेटी वगैरे वस्तूंचा. सिव्हिल प्रोसीजर कोडच्या क.६० मध्यें ज्या अर्थानें ‘कारागीर’ (आर्टिस्ट) हा शब्द वापरला आहे त्या अर्थानें गवई ‘कारागीर’ असतो किंवा काय हें आपल्याला पाहिलें पाहिजे. आमचें मत असें आहे कीं, ‘औद्योगिक कले’वर उपजीविका करणारी व्यक्ति ‘कारागिर’ असते. गवयाचा औद्योगिक कलेशीं कांहींच संबंध येत नसल्यामुळें तो कारागीर नसतो, म्हणून त्याच्या जवळचीं वाद्यें ‘कारागिराचीं अवजारें’ नसतात. सबब तीं अवजारें जप्तीस पात्र असतात. वरील कारणास्तव हें रिव्हिजन मंजूर करून खालच्या कोर्टाचा निकाल रद्द करतों.”

कारागिराचीं अवजारें जप्तीस पात्र नसतात. औद्योगिक कलेवर उपजीविका करणारास ‘कारागिर’ म्हणतात. औद्योगिक कलेशीं गवयाचा संबंध येत नाहीं म्हणून तो ‘कारागिर’ नसतो, सबब त्याचीं अवजारें (वाद्यें) जप्तीस पात्र असतात. —‘न्यायबोध’

---

### उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन सैनिक

उत्तर आयर्लंडमध्यें अमेरिकन सैनिक उतरले, त्यासंबंधांत आयराच्या सरकारशीं ब्रिटिश अथवा अमेरिकन सरकारचें कांहीं बोलणें झालेलें नव्हतें. मि. डी व्हॅलेरा ह्यांनीं त्याबद्दल आपली नाराजी व्यक्त केली आहे. "अमेरिकेशीं आपलें वाकडें नाहीं व त्याचे बरोबर भांडण होऊं नये अशीच आमची इच्छा आहे, असें ते म्हणाले.

### बॉम्बहल्ल्यांचा अनुभव

बॉम्बहल्ल्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याकरितां, संयुक्त प्रांताचें सरकार एक पोलिस दल ब्रह्मदेशाकडे पाठविणार आहे.

### दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि. कोल्हापूर

वरील बँकेच्या, ३० जून, १९४१ अखेरच्या २८ व्या वार्षिक अहवालावरून व ताळेबंदावरून तिच्या प्रगतीची कल्पना येते. बँकेच्या संकल्पित ३५ हजारांच्या भांडवलापैकी, ३४,९९५ रुपये रोख वसूल आहेत. रिझर्व्ह फंड ५७½ हजारांचा असून इतर फंडांत सुमारें ६१ हजार रुपये आहेत. बँकेकडील ठेवींची रकम १ लक्ष, ८७ हजार, रुपये भरते. स्थानिक इतर बँकांच्या ठेवीवरील व्याजाचे दरापेक्षा कोल्हापूर अर्बनचे दर कमी असतांहि ठेवींत वाढ झालेली आहे, हें नमूद केलें पाहिजे. बँकेचे ४९ हजार रुपये रोख हातांत व इतर बँकांत खात्यांवर असून तिनें ६०½ हजार रुपये सरकारी रोख्यांत व पोस्टल कॅश सर्टिफिकेटांत गुंतविलेले आहेत. बँकेचे सभासदांकडून १ लक्ष, ३३ हजार रुपये कर्ज, सोसायट्यांकडून ७८½ हजार रुपये कर्ज व सभासदांकडून १०½ हजार रुपये कॅश क्रेडिट येणें आहे. इमारत व आड मिळून १६½ हजारांची जिंदगी आहे. बँकेची एकूण थकबाकी १ लक्ष, ५ हजार रुपये आहे. म्हणजे मागील सालाचे मानानें ती २४ हजारांनीं कमी आहे. बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलापैकी ( ३ लक्ष, ९८ हजार रुपये ) सुमारें ४२% भांडवल ( १ लक्ष, ५३½ हजार रुपये ) बँकेचें स्वतःचेंच आहे, व बँकेनें आपल्या जिंदगीपैकी सुमारें १ लक्ष १० हजार रुपये रोख अगर सरकारी रोख्यांत ठेवले आहेत, ही गोष्ट समाधानकारक आहे, व ती बँकेची मजबुती दर्शविते. थकबाकीचा आकडा कमी करण्याची आवश्यकता बोर्डास पटलेली असून त्याबाबत कसून प्रयत्न चालू आहेत. बँकेचे ८०½ हजारांचे हुकुमनामे वसुलीसाठी तयार आहेत. सहकारी खात्यानें बँकेस शेतकी सोसायट्यांना कर्जें देण्यास परवानगी दिली असल्यामुळें ही बँक सेंट्रल बँकेचेंहि काम करीत आहे. ह्या आद्य संस्थेचें रूपांतर मध्यवर्ती फायनान्सिंग एजन्सीमध्यें होणें आवश्यक आहे ह्या दृष्टीनें प्रयत्नहि सुरू झाले आहेत. वर्षअखेर बँकेस ४,६०८ रुपये निवळ नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½% डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. डिव्हिडंड देऊन उरणारी रकम इन्व्हेस्टमेंट फ्ल. फंडाकडे वर्ग करण्यांत आली. श्री. गणपतराव नारायणराव भोसले हे बँकेचे अध्यक्ष होते. त्यांचे व श्री. श्री. शं. गुप्ते, बी. कॉम, मॅनेजर ह्यांचे बँकेच्या गेल्या वर्षातील प्रगतीबद्दल अभिनंदन केलें पाहिजे.

---

### हिंदी चित्रपटांची लांबी

हिंदी चित्रपटांची लांबी विदेशी फिल्म्सच्या लांबीपेक्षा फार मोठी असते व ती कमी केल्यानें हिंदी फिल्म्स अधिक करमणूक करूं शकतील, असें मत बंगाल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्सच्या अध्यक्षांनीं नुकतेंच व्यक्त केलें. हिंदी फिल्म्सच्या प्रदीर्घतेविषयींची ही तक्रार नवी नाहीं व तीमध्यें तथ्यहि आहे. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या चित्रपटांची लांबी फारच जास्त, कधी कधी १५½ हजार फुटांपेक्षाहि अधिक असते. तथापि, १९४१ मध्यें दाखविण्यांत आलेल्या ४८ हिंदी चित्रपटांच्या लांबीची सरासरी १२,५९९ फूट पडलेली आहे. सध्याच्या युद्धपरिस्थितींत कच्च्या फिल्म्सची काटकसर करणें आवश्यक झालेलें असल्याकारणानें हिंदी चित्रपटांची लांबी कमी करण्यास प्रस्तुत वेळ सोईची आहे. ब्रिटिश सरकारनें तेथील फिल्म कंपन्यांना कच्ची फिल्म कमी वापरण्याविषयीं विनंति केलेली आहे. हिंदुस्थानांत कच्ची फिल्म तयार होत नसल्याकारणानें व आयात दिवसेंदिवस अवघड होत असल्याकारणानें हिंदी कंपन्यांनीं फिल्म्सची काटकसर करणें अधिकच इष्ट झालें आहे.

# स्फुट-विचार

### मि. चर्चिल ह्यांचा रणवणीत विजय

मलाया आणि ब्रह्मदेश ह्यांचे बाजूस जपानच्या चढाईनें त्वरित प्रगति केल्यामुळें आणि तिकडे ब्रिटिशांचें संरक्षक बळ शत्रूचा प्रतिकार तात्काळ करण्यास असमर्थ ठरल्याकारणानें इंग्लंडमध्यें मि. चर्चिल ह्यांच्या प्रधान मंडळाच्या कार्यक्षमतेविषयीं शंका उत्पन्न होऊन त्यावर प्रतिकूल टिकाहि प्रकटपणानें होऊं लागली. युद्धाच्या बिकट परिस्थितींत आणि शत्रूस दूरदूरच्या अनेक रणांगणांत एकाच वेळीं तोंड द्यावें लागत असतां आपण शक्य तों युद्ध प्रयत्न करीत असल्यामुळें ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांस आपल्या मंत्रिमंडळावर होणाऱ्या टीकेचा निर्णायक समाचार घेणें अगत्याचें वाटलें. आजपर्यंत स्वतःच्या धोरणाचें स्पष्टीकरण व समर्थन त्यांनीं कॉमन्स सभेंत अनेकवार केलें आहे. तथापि, टीकाकारांस स्वतःचे विचार निर्भीडपणानें पुढें मांडण्याची संधि देऊन जरूर वाटल्यास मुख्य प्रधान व मंत्रिमंडळ बदलण्याचा मार्ग कॉमन्स सभेस मोकळा करून ठेवण्याचें त्यांनीं ठरवलें. लोकशाही राज्यव्यवस्थेच्या तत्वास व पद्धतीस अनुसरून ही योजना त्यांनीं निश्चित केली. युद्धाची परिस्थिति कसकशी बदलत गेली, रशियास लढाऊ सामुग्री पुरवण्याचें व लिबियांत युद्ध चालू ठेवण्याचें महत्व काय होतें आणि मलायांत बाजू लंगडी पडणें कसें अपरिहार्य होतें ह्या सर्व गोष्टींचा तपशीलवार खुलासा मि. चर्चिल ह्यांनीं आपल्या भाषणांत केला. त्यावर तीन दिवस खुल्या दिलानें चर्चा होऊन त्यांच्या मंत्रिमंडळावरचा आपला पूर्ण विश्वास व्यक्त करणारा ठराव कॉमन्स सभेनें एक विरुद्ध चारशेचौसष्ट मतांनीं मान्य केला. युद्धाच्या बाबतींत ब्रिटिश जनतेनें आपल्या सरकारास असा जोराचा पाठिंबा दिल्यानें त्याचें कार्य अधिक उत्साहानें चालण्यास सहाय होईल ह्यांत शंका नाहीं.

---

### साखरेच्या धंद्याचें मध्यवर्ती मंडळ

हिन्दी साखरेच्या धंद्याचे संबंधांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचा विचार करून त्यांचे बाबतींतल्या धोरणाविषयीं सल्ला देण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक मध्यवर्ती मंडळ नेमलें आहे ह्याची माहिती आमच्या वाचकांस आहेच. ह्या मंडळाची सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. तीमध्यें भाषण करतांना सरकारच्या व्यापार मंत्र्यांनीं स्वदेशी साखरेचे नवीन कारखाने देशाच्या निरनिराळ्या भागांत स्थापन होत असून मालास असलेल्या मागणीच्या मानानें उत्पादन व पुरवठा वाढत चालला आहे. त्याच्या किंमतीं व खप ह्यांची समाधानकारक व्यवस्था कशी लावावी ह्या प्रश्नाकडे प्रामुख्यानें लक्ष वेधून त्या बाबतींत मंडळाचा अभिप्राय विचारला. कारखान्यांची स्थापना व त्यांतील उत्पादन ह्यांवर कायद्यानें नियंत्रण न घालतां मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ बसवून साखरेच्या योग्य किंमती व धंद्याचा फायदेशीरपणा ह्यांची व्यवस्था कशी लावावी हा प्रश्न सध्या अवघड होऊं पहात आहे. ऊस पिकविणारे व गुळाचा धंदा करणारे शेतकरी आणि व्यापारी ह्यांच्या हितसंबंधाचीहि गुंतागुंत साखर कारखान्यांच्या उद्योगाशी झालेली आहे. साखरेचे नवीन कारखाने निघण्यापूर्वी प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं त्यांच्या भवितव्याविषयीं चौकशी करून त्यांस परवाने द्यावे अशी एक सूचना मंडळाच्या सभेनें मान्य केली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. कारखान्यांची परस्पर स्पर्धा होऊन साखरेचा खप होण्यास व तिला योग्य किंमती येण्यास अडचण उद्भवूं लागली आहे. तिचें निराकरण वेळींच न झाल्यास कांहीं कारखान्यांस पुढें पश्चात्तापाचा प्रसंग येईल ह्याविषयीं भयचिन्ह अगाऊ डोळ्यांपुढें मांडणें हा वरील सूचनेचा हेतु आहे आणि तो कारखानदारांनीं वेळींच लक्षांत घेणें अगत्याचें आहे.

---

### साखर मंडळाच्या इतर सूचना

व्यापार-मंत्रि व मध्यवर्ती साखर सल्लागार मंडळ ह्यांनीं वरील महत्वाची भयसूचना दिली, तिच्या शिवाय दिल्ली येथील सभेंत इतर बाबींसंबंधानें अभिप्राय व्यक्त केला गेला. कारखान्यांची साखर बाजारांत वेळोवेळ कोणत्या प्रमाणांत पाठवावी ह्या विषयींचे निर्बंध मालाच्या किंमती पडूं नयेत ह्या हेतूनें घालण्यांत आले आहेत, त्यांची आतां चांगल्या भावांच्या परिस्थितींत आवश्यकता नाहीं; चालू हंगामांत उसास द्यावयाच्या किंमती किमान दरानें निश्चित व्हाव्या आणि हंगामाचे अखेरीस साखरेचे सरासरीचे भाव चांगले राहिले असल्यास विशिष्ट प्रमाणांत शेतकऱ्यांस जादा किंमती मिळण्याची तरतूद व्हावी; साखरेच्या बाजारभावांची कमाल मर्यादा ठरवली जाऊन व्यापारी अयोग्य रीतीनें मालाच्या किंमती वाढवीत, आहेत असें दिसल्यास त्यांच्यावर सरकारनें नियंत्रण घालावें इत्यादि प्रश्नांसंबंधानेंहि मंडळानें शिफारसी केल्या. ब्रिटिश सरकार हिंदी साखर विकत घेण्यास तयार आहे असें समजतें आणि ही खरेदी झाल्यास मालाचा उठाव होण्यास मदत मिळेल. परंतु साखरेची किंमत बेताची असली तरच तें सरकार ती विकत घेईल असें समजतें. हिंदी कारखानदारांस व व्यापाऱ्यांस त्यानें देऊं केलेली किंमत परवडेल किंवा कसें हा येथें अवघड प्रश्न आहे. रेल्वे वहातुकीच्या अडचणी वाढत असल्यानें कारखानदारांनीं माल साठवणींत न ठेवतां शक्य तितक्या त्वरेनें त्याची उठावणी करावी असें त्यांस सुचवण्यांत येणार आहे असें कळतें. साखर मंडळाच्या सभा वर्षांतून दोनदां भरावयाच्या असून त्याची पुढली बैठक येत्या मे महिन्यांत व्हावयाची आहे.

---

### कापसाच्या आयातीवर जादा जकात

आखुड धाग्याच्या कपाशीचे भाव उतरल्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीस कसें तोंड द्यावें ह्याविषयीं आवश्यक असलेल्या व्यवस्थेचें विवेचन आजच्या अग्रलेखांत करण्यांत आलें आहे. शेतकऱ्यांनीं ह्या जातीच्या कपाशीचे ऐवजी धान्याचीं वगैरे पिकें काढावीं आणि ह्या व असल्या इतर योजना अमलांत आणण्यास पैसा लागेल त्याच्या पुरवठ्याची तरतूद व्हावी अशा सूचना करण्यांत आल्या आहेत. ह्या कामासाठी फंड लागेल तो उभारण्याचा मार्ग म्हणून हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढून कपाशीच्या आयातीवर दर पौंडास एक आणा ह्याप्रमाणें जादा जकात घेण्यांत येईल असें प्रसिद्ध केलें आहे. ह्या जकातीचें उत्पन्न येईल त्याचा स्वतंत्र फंड बाजूस काढून ठेवण्यांत येईल आणि त्याचा विनियोग सरकारास योग्य दिसेल त्या रितीनें शेतकरी वर्गास सहाय देण्याकडे केला जाणार आहे. ही योजना अर्थातच तात्पुरत्या स्वरूपाची असून पुरेसा फंड जमा झाला आहे असें दिसल्यास जादा जकात काढून घेण्यांत येईल.

फंडाच्या विनियोगाची तपशीलवार योजना प्रांतिक व संस्थानी सरकारें आणि गिरणीवाले व व्यापारी मंडळें ह्यांच्याशीं विचार-विनिमय होऊन निश्चित करण्यांत येईल. आखूड धाग्याच्या कापसाची किंमत चालू भावाच्याहि खाली जाऊं लागल्यास त्यापैकी कांहीं माल सरकार खरेदी करून तात्पुरता साठवील किंवा गिरणीवाल्यांस व व्यापाऱ्यांस त्याची खरेदी करण्यास सहाय देईल. बाजारभाव स्थिर करण्याची ही तात्पुरती योजना झाली. पण हलक्या जातीच्या कपाशीचें क्षेत्र कमी करण्यासाठी शेतकऱ्यांस निरनिराळ्या मार्गांनीं द्रव्यसहाय द्यावें लागेल त्याचीहि तजवीज करणें आवश्यक आहे. ह्या सर्व गोष्टींस लागणारा पैसा उभारण्याचें काम महत्त्वाचें असल्यानें त्या बाबतींतला उपक्रम हिंदुस्थान सरकारनें तातडीनें केला आहे, ही गोष्ट स्तुत्य आहे. फंड किती जमा होईल, जादा जकातींचे परिणाम कापडाच्या किंमती व गिरण्या ह्यांचेवर काय होतील हे प्रश्न अर्थातच येथें उद्भवतात आणि त्यांचाहि विचार सरकारास करावा लागेल. तो करतांना जरूर असलेला फंड उभारण्याचे दुसरे मार्ग उपलब्ध आहेत किंवा नाहींत आणि ते अधिक युक्त होतील किंवा कसें ह्याची चर्चा काळजीपूर्वक व्हावी लागेल. सुताच्या व कापडाच्या किंमती अगोदरच चढल्या आहेत आणि जादा आयात जकातीमुळें त्या आणखी वर जातील किंवा कसें ह्या महत्वाच्या बाबी हिशेबांत घेतल्या जाणें आवश्यक आहे. आर्थिक प्रश्न कसे गुंतागुंतीचे असतात आणि त्यांचे एकमेकांवर दूरगामी परिणाम कसे होतात ह्याचें स्मरण येथें ठेवलें जाणें अगत्याचें आहे.

---

### ए. आर. पी. च्या खर्चाची वाटणी

हवाई हल्ल्यापासून बचाव करण्याकरितां केलेल्या खर्चाची वाटणी मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें कशी करावी ह्याचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलाविली होती. ए. आर. पी. साठी होण्याऱ्या एकूण खर्चापैकी एक कोटि रुपयांच्या खर्चाची वाटणी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत समसमान करावी आणि त्यापेक्षा जो ज्यास्त खर्च होईल त्यापैकी ७५% मध्यवर्ती सरकारनें व २५% प्रांतिक सरकारांनीं सोसावा, असें परिषदेंत ठरलें. खर्चाच्या सर्व योजना प्रांतिक सरकारांनीं हातीं घेण्यापूर्वी त्यांस मध्यवर्ती सरकारची मंजुरी मिळविण्यास फार वेळ लागतो. ह्याकरितां प्रांतांच्या आपल्या एकूण उत्पन्नाच्या ४% रकमेइतका खर्च त्यांनीं करून टाकावा असेंहि ठरविण्यांत आलें. खर्चाचे पुढील टप्पेहि निश्चित करून दुसऱ्या टप्प्यांतील खर्चाची मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत वाटणी ५०:५० व तिसऱ्या टप्प्यांतील खर्चाची वाटणी ७५:२५ ह्या प्रमाणांत व्हावी आणि त्यापेक्षा कितीहि ज्यास्त खर्च झाला, तरी मध्यवर्ती सरकारनें त्याचा ८७½% भाग उचलावा व १२½% खर्चाची जबाबदारी प्रांतिक सरकारांनीं घ्यावी, असेंहि परिषदेंत ठरलें. प्रांतिक सरकारांनीं बचावाच्या योजना हातीं घेण्यापूर्वी त्या मध्यवर्ती सरकारकडे पाठविण्याचें आतां प्रयोजन नाहीं; तथापि खर्चाच्या योजनांतील कांहीं बाबी मध्यवर्ती सरकारास मान्य झाल्या नाहींत, तर त्यास मागाहून तकार करतां येईल.

---

### आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

हिटलरशाही आणि जपानी चढाई ह्यांचे विरुद्ध झगडणाऱ्या इंग्लंड व अमेरिका ह्यांसारख्या राष्ट्रांस युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याचे बाबतींत जवळजवळ बिनशर्त परस्पर सहाय करावें लागत आहे. शांततेच्या काळीं मामुली देवघेवीचे आंतरराष्ट्रीय व्यवहार चालतात, तेव्हां व्यापाराच्या ओघांत होणाऱ्या देण्याघेण्याची व्यवस्था विशिष्ट चलन-हुंडणावळीच्या पद्धतीनें होत असते. युद्धपरिस्थितींत व्यापारी देण्याघेण्याच्या मामुली पद्धतीची घडी विस्कटून जाते आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचे दर व अंतर्गत चलन ह्यांची खास व्यवस्था करावी लागते. प्रस्तुत युद्धांत सहकारी राष्ट्रांस अमेरिका लढाऊ सामुग्रीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करीत असून अमेरिकन खंडांतील राष्ट्रांमध्यें परस्पर सहायाची योजना नुकतीच निश्चित झाली असल्यानें त्यांच्यामधील देण्याघेण्याची समाधानकारक योजना अमलांत आणणें आवश्यक झालें आहे. अमेरिकन खंडांतील देशांच्या परस्पर व्यापारामध्यें सर्वमान्य होईल असें किंमतीचें मान निश्चित करण्याच्या कल्पनेचा विचार चालू असल्याचें अमेरिकेच्या तिजोरीचे चिटणवीस मि. मॉर्गेन्थॉ ह्यांनीं बोलून दाखवलें आहे. पौंड व डॉलर ह्यांच्या विनिमयाचा दर आज स्थिर व निश्चित केला गेला आहे, त्याप्रमाणेंच अमेरिकन खंडांतील देशांच्या चलनाच्या परस्परांच्या देवघेवीच्या किंमती विशिष्ट रीतीनें ठरवून टाकण्याची ही योजना आहे. ती अमेरिकेंत सर्वमान्य झाल्यास तिची अंमलबजावणी त्या खंडाच्या बाहेरहि केली जाणार आहे. अशा प्रकारची व्यवस्था युद्धपरिस्थितींत अत्यंत आवश्यक आहे ह्यांत संशय नाहीं.

---

### फ्रेंच उद्योगधंद्यांवर जर्मनीचें वर्चस्व

जर्मनी फ्रान्सकडून कच्चा माल विकत घेत नाहीं. कापड, विजेचें साहित्य, कांच सामान, कागद, इत्यादि जिनसांची खरेदी जर्मनी फ्रान्समध्यें करतो, त्यामुळें फ्रेंच कारखानदारांस आपण जर्मनीस युद्धसहाय करीत आहों, अशी टोचणी लागत नाहीं व युद्धसमाप्तीनंतर फ्रेंच कारखान्यांत फेरफार करावा लागण्याची आवश्यकता भासणार नाहीं. तथापि ह्या पद्धतीमुळें जर्मनीला आपली सर्व शक्ति युद्धोपयोगी मालाचे उत्पादनाकडे लावतां येते. जर्मनी फ्रान्सला कच्चा माल पुरवितो. फ्रान्समधील लहान व मध्यम आकाराच्या कारखान्यांस आतां आपला माल निर्गत करतां येऊं लागला आहे. हळूहळू फ्रेंच कारखानदार युद्धोपयोगी मालहि काढूं लागले आहेत व जेथें विरोध आढळतो तेथील कारखान्यांच्या भाग भांडवलांत आपलें बहुसंख्यत्व करवून घेण्याचा जर्मनीचा प्रयत्न असतो. अशा रीतीनें फ्रेंच कारखाने जर्मन पंखाखाली येत आहेत. लंडन टाइम्स पत्राच्या बातमीदारानें ही हकीकत प्रसिद्ध केली आहे.

---

#### ब्रह्मदेशांतून परतलेले लोक

रंगूनवरील पहिल्या बाँबहल्ल्यानंतर ब्रह्मदेश सोडून निघालेले १०½ हजार लोक आतांपर्यंत चितगांव बंदरांत येऊन उतरले व तेथून ते आपआपल्या गांवीं हळूहळू गेले.

#### बंगाल प्रांताचें बजेट

बंगाल प्रांताच्या येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत दोन कोटि रुपयांची तूट अपेक्षित आहे.

## डिसेंबर महिन्यांतील आर्थिक उलाढाली

( प्रो. काळे ह्यांचें मुंबई रेडिओवरील भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांचें कृपेनें उद्धृत करण्यांत येत आहे )

बाजारभावांत युद्धपरिस्थितीमुळें चढउतार होतो त्याचा आणि विशेषतः धान्य, कापड, कोळसा असल्या जीवनास अत्यावश्यक असलेल्या जिनसांच्या किंमती बेसुमार चढतात, त्यांचा सर्व बाजूंनीं विचार करून महागाईवर उपाययोजना करण्याच्या हेतूनें फेब्रुवारीचे प्रारंभीं दिल्ली येथें प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद भरणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. अशा परिषदा मागें भरल्या आहेत आणि पुढेंहि मधून मधून भरणें आवश्यक आहे. युद्धक्षेत्रांत नवीन नवीन घडामोडी होतात आणि धान्यधुन्याच्या पुरवठ्यावर नैसर्गिक व इतर कारणें ह्यांचा परिणाम होऊन परिस्थिति बदलते, तिचा विचार केवळ स्थानिक किंवा प्रांतिक दृष्टीनें करून चालत नाहीं. ह्या प्रश्नाची चर्चा आणि त्यासंबंधांतले निर्णय अखिल भारतीय व युद्धविषयक भूमिकेवर व्हावे लागतात. नित्याच्या जीवनास लागणाऱ्या जिनसांच्या पुरवठ्याचे बाबतींत कोणताहि प्रांत किंवा जिल्हा सर्वस्वी स्वावलंबी होऊं शकत नाहीं. ह्या पदार्थांची देवघेव जिल्ह्याजिल्ह्यांत व प्रांताप्रांतांत चालत असते आणि एका ठिकाणचा तुटवडा दुसऱ्या ठिकाणांतील शिलकी किंवा फाजील पुरवठ्यांतून भरून काढावा लागतो. तसें करतांना वहातुकीच्या साधनांची पुरेशी व्यवस्था आहे किंवा नाहीं, कोणी व्यापारी आपला माल आणखी अधिक महाग व फायदेशीर रीतीनें विकतां यावा म्हणून त्याचा पुरवठा अडकवून ठेवीत आहेत काय आणि दुकानदार परिस्थितीचा अवास्तव फायदा घेऊन जिनसांच्या किंमती भरमसाटपणानें चढवीत आहेत कीं काय ह्या गोष्टींकडे अधिकाऱ्यांनीं लक्ष पुरवणें अगत्याचें असतें. युद्धासारख्या गडबडीच्या काळांत थोडीफार महागाई होणें अपरिहार्य असतें, हें खरें. तथापि, सामान्य जनतेस जाचक होणार नाहींत अशा बेतानें जिनसांच्या किंमती नियंत्रित करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. शक्य तेथें पुरवठा निरनिराळ्या मार्गांनीं वाढवून, वाहतुकीच्या सवलती व सोयी उपलब्ध करून व व्यापाऱ्यांच्या नफेबाजीस आळा घालून मागणी व पुरवठा यांचा मेळ त्यास घालावा लागतो. फेब्रुवारीच्या आरंभीं दिल्ली येथें भरणाऱ्या परिषदेच्या त्रोटक रीतीनें प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमासंबंधानें असें म्हटलें आहे कीं बाजारभावांच्या सरकारी नियंत्रणाच्या अलीकडील परिस्थितीचा विचार करणें, जरूरीच्या जिनसांच्या पुरवठ्याची पहाणी करणें आणि हे जिन्नस बेताच्या किंमतीनें सर्वत्र सारखे उपलब्ध होण्याची व्यवस्था करण्याच्या उपायांची चर्चा करणें हे प्रश्न मुख्यत्वेंकरून चर्चिले जातील. परिषदेच्या ह्या उद्देशांचें अधिक स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं.

कच्चा व पक्का माल, देशांत उत्पन्न होणारे व बाहेरून येणारे जिन्नस ह्या सर्वांच्या बाजारभावांचें नियंत्रण करण्याचा प्रश्न येथें नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कपास, गळिताचीं धान्यें वगैरे शेतीच्या मालास असलेलें परराष्ट्रीय गिऱ्हाईक मर्यादित झाल्यामुळें त्याच्या किंमती चढल्या नाहींत हें युद्धपरिस्थितींत स्वाभाविकच आहे. तथापि, गहूं, तांदूळ, बाजरी, इत्यादि शेतीचाच माल विलक्षण महागला आहे. हे जिन्नस आणि कोळसा, लाकूडफाटा, राकेल इत्यादि आवश्यक पदार्थ ह्यांची महागाई होणें एकंदर जनतेच्या दृष्टीनें अनिष्ट असल्यानें ह्या मालाच्या संबंधांत उत्पादक, उपभोक्ते व व्यापारी ह्या वर्गांच्या हितसंबंधांचा योग्य मेळ घालावा लागतो हेंच धोरण प्रांतिक सरकारांनीं अंगिकारलें आहे. पंजाबमध्यें तेथील सरकारानें गव्हाच्या किंमती ठरवून टाकल्या आहेत, एवढेंच नव्हे तर कांहीं महत्त्वाच्या बाजारांतील गहूं आपल्या स्वतःच्या हुकमतींत आणला असून त्याची विक्री नियंत्रित केली आहे. कांहीं जातींच्या मालाचा पुरवठा तोकडा होणार असें दिसतांच मुंबईमधील व्यापाऱ्यांनीं त्याच्या किंमती एकदम चढवल्या आणि त्याकारणानें सामान्य लोकांस नित्याच्या उपयोगाच्या जिनसांचा पुरवठा होणें कठीण झालें. कोळसा, गहूं, तांदूळ आणि ज्वारी ह्यांच्या किंमती ह्या रीतीनें कडकल्याकारणानें मुंबई सरकारनें बी. बी. अँड सी. आय. आणि जी. आय. पी. ह्या रेल्वेजच्या अधिकाऱ्यांशीं बोलणें करून ह्या जिनसांच्या वहातुकीसाठी वॅगन्सचा पुरवठा होण्याची व्यवस्था तावडतोब केली. अल्प प्राप्तीचीं व हातावरचें पोट असणारीं हजारों मध्यम व कनिष्ट आर्थिक स्थितींतलीं कुटुंबें मुंबई शहरांत आहेत. त्यांच्या सुरळीतपणाच्या चरितार्थाचे आड व्यापाऱ्यांचें स्वार्थी धोरण येऊं लागल्यास त्यांचा समाचार सरकार घेतल्यावांचून रहाणार नाहीं, असें त्यांस बजावण्यांत आलें आहे तें युक्तच आहे. युद्धधोरण यशस्वी होण्यासाठी लढाऊ सामुग्री तातडीनें रेल्वेमार्गानें पाठवावी लागते आणि त्या कामीं रेल्वेच्या वाघिणी कांहीं काळपर्यंत गुंततात व बिनलढाऊ वहातुकीच्या उपयोगास येऊं शकत नाहींत. ह्या तात्पुरत्या गरजेच्या वेळीं व्यापाऱ्यांनीं पुरवठ्याचा तुटवडा आहे ह्या सबबीवर मालाच्या किंमती वाढवणें किंवा चढीच्या भावानें मुदतीचे खरेदीचे वायदे करणें अयोग्य आहे, ह्यासंबंधांत प्रांतिक सरकारानें व्यापाऱ्यांस योग्य वेळीं व स्पष्ट इशारत दिली आहे, तिचा आवश्यक तो इष्ट परिणाम होईल अशी अपेक्षा आहे. तसा तो न झाल्यास किंमतीचें नियंत्रण करण्याचा सरकारास अधिकार आहे त्याची अंमलबजावणी करण्यास तें मागेंपुढें पाहणार नाहीं. ( अपूर्ण )

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( ३० नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | १०८-१ |
| ४% १९४३ | १०३-० |
| ३½% बिनमुदत | ९५-० |
| ३½% १९४७-५० | १०१-६ |
| ३% ( १९६३-६५ ) | ९४-४ |
| २¾% १९४८-५२ | ९७-० |

### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४७-८-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ७०-०-० |


### न्यायमूर्ति रानड्यांचे तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४.

ह्या पत्त्यावर आठ आण्यांची तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

महायुद्ध दाराशीं आलें
परदेशी औषधें
दुर्मिळ व महाग झालीं
पण
भिण्याचें कारण नाहीं !!!
— कारण —
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं
● रक्तवर्धक, ● उपनाह,
● बालजीवन, ● कॅल्सीप्राल
इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें
★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★
दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.
आयुर्वेद रसशाळा पुणें लि०
मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.



सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
' पायोनियर डाइंग हाऊस '
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, हातेवाडी, पुणें.



महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत
साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,
आकर्षक
सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग
सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें एकच ठिकाण
पेन्टर ए. जी. बेडेकर
( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )
बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )
बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.



कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार
★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.


हेड ऑफिस बिल्डिंग

कॉमनवेल्थ
ॲशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन
* रा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट * एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.